# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा(MAHATET)-2024
# पात्र उमेदवारांना प्रमाणपत्र स्विकारण्याबाबत सुचना

---

**पात्रता प्रमाणपत्र स्विकारतांना खालील प्रमाणपत्रांचे छायांकीत प्रतीचे एक संच व मुळ प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रावर उमेदवारास शिक्षणाधिकारी यांचे समक्ष स्वाक्षरी करावयाची असल्याने केवळ उमेदवारांना प्रमाणपत्र दिल्या जाईल.**

**प्रमाणपत्र स्विकारण्याचा कालावधी :- दिनांक 08.09.2025 ते**
**दिनांक 22.09.2025 पर्यंत**

1. महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रवेश पत्राची प्रत,
2. महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने काढलेल्या गुणपत्रिकेची प्रत.
3. डि.एड./बी.एड. प्रमाणपत्र किंवा गुणपत्रिकेची प्रत
4. जात प्रमाणपत्राची प्रत
5. दिव्यांग असल्यास दिव्यांग प्रमाणपत्राची प्रत
6. माजी सैनिक असल्यास त्याबाबतचा पुरावा दाखल दस्ताऐवजाची प्रत
7. कोणतेही एक ओळखपत्र (आधार/पॅन कार्ड/ड्राईव्हींग लायसन्स/निवडणुक ओळखपत्र इ.) या संपूर्ण दस्ताऐवजाची छायांकीत प्रतीचे संच व मुळ प्रतीसह स्वत: उमेदवाराने शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद गडचिरोली यांचे कार्यालयास उपस्थित राहून पात्रता प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे. सदर प्रमाणपत्र स्विकारण्यास स्वत: उमेदवार उपस्थित राहणे अनिवार्य आहे. कोणत्याही त्रयस्थ व्यक्तिकडे पात्रता प्रमाणपत्र देण्यात येणार नाही याची नोंद सर्वांनी घ्यावी.

दिनांक:- 08.09.2025.

(बाबासाहेब पवार)
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
जिल्हा परिषद गडचिरोली

## प्रमाणपत्राचे वितरण खालील सूचना प्रमाणे करावे.

१. उमेदवारांनी खालील कागदपत्रे व प्रमाणपत्रे यांच्या प्रती घेऊन महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रमाणपत्र घेण्यासाठी उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

**अ)** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रवेशपत्र प्रत.

**ब)** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा गुणपत्रिका प्रत.

**क)** डी.टी.एड उत्तीर्ण गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र अथवा बी.एड. उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा गुणपत्रक

**ड)** आरक्षण प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र.

**इ)** दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र.

**फ)** माजी सैनिक असल्यास त्याबाबतचा पुरावा.

**ग)** ओळखपत्र (आधार कार्ड, पॅनकार्ड, ड्राइव्हिंग लाईसन्स, निवडणूक ओळखपत्र इ.)

२. प्रमाणपत्र वितरणाची पेपर निहाय नोंद वही ठेवावी. (त्याची एक प्रत या कार्यालयास द्यावी)

३. **महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) २०२४** परीक्षा **दि. १०/११/२०२४** चे पात्रता प्रमाणपत्र संबंधित उमेदवाराला वितरित करताना प्रमाणपत्राच्या मागील पृष्ठावर संबंधित विद्यार्थ्याने शिक्षणाधिकारी (प्राथ.)/ शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचे समक्ष स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्यानुसार स्वाक्षरी घेऊन व संबंधितांच्या प्रमाणपत्राची खात्री करुन शिक्षणाधिकारी (प्राथ.)/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांनी प्रमाणपत्र वितरीत करावे.

४. पात्र परीक्षार्थीना शिक्षणाधिकारी प्राथमिक शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचेमार्फत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचेकडे लेखी तक्रार नोंदवावी. अर्जासोबत पुरावा दर्शक कागदपत्रे (गुणपत्रक, प्रमाणपत्र) जोडावेत. शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांनी सदर तक्रारींचा शहनिशा करुन स्व: अभिप्रायासह सदर तक्रारी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे त्वरीत पाठवाव्यात.

**(अनुराधा ओक)**
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०४.